पालघर जिल्ह्यातील डहाणू, वसई व पालघर तालुक्यांतील अनुक्रमे कासा, विरार व बोईसर येथे अपर तहसिलदार कार्यालये कार्यान्वित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## महसूल विभाग
### शासन निर्णय क्रमांकः प्राफेब-२०२६/प्र.क्र.८०(ड-३)/पुनर्रचना

पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई -४०००३२
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६

**वाचा:- शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. पदनि २०१९/प्र.क्र.६८ (भाग-२)/आस्था-८, दि.०२.०४.२०२६**

**प्रस्तावना:-**

शासकीय कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप व उपलब्ध अपुरा अधिकारी/कर्मचारीवृंद, तालुक्यांचे भौगोलिक स्थान, वाढती लोकसंख्या, नागरीकरण विचारात घेता प्रशासन लोकाभिमुख करून कामकाजात गतीमानता आणण्यासाठी तसेच तहसील कार्यालय बळकट करून त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या विविध सेवा नागरिकांना सहज व नजिक उपलब्ध व्हाव्यात यासाठी पालघर जिल्ह्यातील डहाणू, वसई व पालघर तालुक्यात अपर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

पालघर जिल्ह्यातील डहाणू, वसई व पालघर तालुक्यांमध्ये अपर तहसिलदार कार्यालये स्थापन करण्यास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. पदनि २०१९/प्र.क्र.६८ (भाग-२)/आस्था-८, दि. ०२.०४.२०२६ मधील परिशिष्ट-६ अन्वये मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-१३ मध्ये नमूद केल्यानुसार पदांना मंजुरी देण्यात आली आहे. सदर पदे संबंधित संवर्गाचाच भाग राहतील.

२. त्याअनुषंगाने, पालघर जिल्ह्यातील डहाणू, वसई व पालघर तालुक्यांतील अनुक्रमे कासा, विरार व बोईसर येथे अपर तहसील कार्यालये कार्यान्वित करण्यास व आवश्यक अनुषंगिक बाबींना या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३.	पालघर जिल्ह्यातील तहसिलदार कार्यालये व अपर तहसिलदार कार्यालये यांच्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे महसूल मंडळांचा समावेश राहील:-

**३.१. तहसिलदार कार्यालय, डहाणू व अपर तहसिलदार कार्यालय, कासा :**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | महसूल मंडळांची नावे | महसूल मंडळे संख्या |
|---|---|---|---|
| १ | तहसिलदार कार्यालय, डहाणू | डहाणू, मल्याण, आशागड, चिंचणी, वाणगाव, आंबेसरी | ६ |
| २ | अपर तहसिलदार कार्यालय, कासा | कासा, चारोटी, सायवन | ३ |

**३.२. तहसिलदार कार्यालय, वसई व अपर तहसिलदार कार्यालय, विरार :**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | महसूल मंडळांची नावे | महसूल मंडळे संख्या |
|---|---|---|---|
| १ | तहसिलदार कार्यालय, वसई | वसई, पेल्हार, निर्मळ, माणिकपूर, कामण | ५ |
| २ | अपर तहसिलदार कार्यालय, विरार | विरार, मांडवी, आगाशी, बोळींज | ४ |

**३.३. तहसिलदार कार्यालय, पालघर व अपर तहसिलदार कार्यालय, बोईसर :**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | महसूल मंडळांची नावे | महसूल मंडळे संख्या |
|---|---|---|---|
| १ | तहसिलदार कार्यालय, पालघर | पालघर, माहिम, आगरवाडी, सफाळे, कोळगाव, दहिसर तर्फे मनोर | ६ |
| २ | अपर तहसिलदार कार्यालय, बोईसर | बोईसर, तारापूर, मनोर, लालोंडे | ४ |

४. अपर तहसिलदार, अनुक्रमे कासा (ता. डहाणू), विरार (ता. वसई) व बोईसर (ता. पालघर), जि. पालघर यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, पालघर हे काम पाहतील.

५. अपर तहसिलदार, अनुक्रमे कासा (ता. डहाणू), विरार (ता. वसई) व बोईसर (ता. पालघर) ), जि. पालघर यांना या शासन निर्णयान्वये त्यांच्या कार्यालयाचे कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. नवीन अपर तहसिल कार्यालय कार्यान्वित झाल्यानंतर सदर कार्यालयाकडून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ या कायद्यान्वये असलेले सर्व अधिकार व कर्तव्ये त्यांच्याकडे नेमून दिलेल्या क्षेत्रासाठी वापरण्यात येतील. या व्यतिरिक्त इतर कामकाज संपूर्ण तालुक्यासाठी हाताळण्याचे अधिकार हे मुळ तहसिल कार्यालयास राहतील. महसूली कामकाजा व्यतिरिक्त इतर कामकाजाबाबत (उदा. निवडणूक, संजय गांधी निराधार योजना व इतर ) अर्ज / निवेदने प्राप्त झाल्यास सदर अर्ज / निवेदने स्विकारुन ती पुढील कार्यवाहीसाठी तहसिलदार कार्यालयास पाठविण्यात यावीत.

७. सदर कार्यालयासाठी तहसिलदार यांची पदस्थापना शासनस्तरावरून करण्यात येईल. इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदस्थापना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून त्यांचे स्तरावर करावे.

८. सध्या तात्पुरत्या स्वरूपात नवीन अपर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यासाठी तात्पुरते कार्यालय निश्चित करावे. तदनंतर कायमस्वरूपी जागा शोधून नवीन कार्यालयाच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनास त्वरित सादर करावा.

९. परिच्छेद क्र.७ व ८ मध्ये नमूद बाबींची पूर्तता करून त्याबाबतचा १५ दिवसांत शासनास अहवाल सादर करावा. तदनंतर कार्यालयाचे प्रत्यक्ष कामकाज सुरू करण्याबाबत शासनस्तरावरून कळविण्यात येईल.

१०. तहसिलदार कार्यालये, डहाणू, वसई व पालघर या कार्यालयांकरीता येणारा खर्च हा ज्या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात येतो, त्याच लेखाशीर्षाखाली अनुक्रमे कासा, विरार व बोईसर अपर तहसिलदार कार्यालयांकरीता येणारा खर्च दर्शविण्यात यावा. सदरचा खर्च सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. सदरहू लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूद अपुरी

पडत असल्यास, आठमाही अंदाजपत्रक सादर करताना वाढीव तरतुदीची मागणी करावी; ते शक्य नसल्यास पूरक मागणीचा प्रस्ताव शासनास सत्वर सादर करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९२२२०१४०९००४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RANI DEELIPRAO DEOKATE
Date: 2026.09.22 20:14:57 +05'30'

(राणी दि. देवकते)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु, क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
१५.जिल्हाधिकारी, पालघर.
१६.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर.
१८. संबंधित उपविभागीय अधिकारी, जि. पालघर.
१९.तहसिलदार, ता.डहाणू, जि. पालघर.
२०.तहसिलदार, ता.वसई, जि. पालघर.
२१.तहसिलदार, ता.पालघर, जि. पालघर.
२२.अपर तहसिलदार, कासा, ता.डहाणू, जि. पालघर.

२३.अपर तहसिलदार, विरार, ता.वसई, जि. पालघर.
२४.अपर तहसिलदार, बोईसर, ता.पालघर, जि. पालघर.
२५.वित्त विभाग (का. विसू-१/ अर्थसंकल्प-६/ व्यय-९/ आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई
२६.महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
२७.निवड नस्ती-कार्यासन पुनर्रचना.